Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832 A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX 25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.म./परीक्षा-८/३८६४
पुणे - ४११००४
दिनांक -१० नोव्हेंबर २०२५

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेषअतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...

संदर्भ :- १. शासनाचे पत्र क्र.एसएससी-२००२(६६/०२)/उमाशि-२ दिनांक २३ एप्रिल, २००३.
२. शासनाचे पत्र क्र.एसएससी-२०११(१८५/११)/उमाशि-२ दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की,फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि १०/११/२०२५ रोजी सुरु होत आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची निर्धारीत मुदत संपल्यानंतर (१)श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिविद्यार्थी प्रतिदिनी रु. ५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु. १००/- विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या अगोदरच्या दिवसापर्यंत म्हणजेच दि. ०९/०२/२०२६ पर्यंत रु.२००/- प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

लेखी परीक्षा दि. १०/०२/२०२६ रोजी सुरू झाल्यानंतर कोणत्याही नियमित, पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार, खाजगी विद्यार्थी, तुरळक व आय.टी.आय. विषय घेणा--या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

परीक्षा	अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. ५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. १००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)	अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. २००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे)
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा	मंगळवार दि.११/११/२०२५ ते मंगळवार दि.२३/१२/२०२५	बुधवार दिनांक २४/१२/२०२५ ते बुधवार दिनांक ०७/०१/२०२६	गुरुवार दिनांक ०८/०१/२०२६ ते गोमवार दिनांक ०९/०२/२०२६

--२--

१) सदर आवेदनपत्र कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र online भरले या विद्यार्थ्यांचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क online चलन तयार करून चलनावर नमुद ICICI बँकेच्या Virtul Account मध्ये कोणत्याही बँकेतुन RTGS/NEFT द्वारे त्वरीत जमा करण्यात यावे रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application status मध्ये Send to board व Payment status मध्ये Paid अशा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी अशे status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच प्राहय धरण्यात येतील विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व चलने रिजेक्ट करून व त्याचे status ची खात्री करून पुढील कार्यवाही करावी

२) प्रचलित पध्दतीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबंधित उच्च माध्यमिक शाळाप्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहीत प्रपत्रांसह पाठविण्यात यावे. तसेच सदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत.

३) मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी. तसेच **कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

Digitally signed by
Dipak Ambadas Mali
Date: 10-11-2025
18:55:18

राज्य मंडळ, पुणे

जोडपत्र — परिशिष्ट अ व शुल्क आकारावयाचा तक्ता

क्र.मुंविमं/उमाप/ ४४९५
वाशी नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक- ११ /११ /२०२५

प्रति,
मुख्याध्यापक
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
मुंबई /बृहन्मुंबई / ठाणे / पालघर /रायगड जिल्हे.

उपरोक्त पत्रानुसार प्राचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
प्र. विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३

प्रत योग्य त्या कार्यावाहीसाठी अग्रेषित :-
१ मा.शिक्षण उपसंचालक,मुंबई.
२ शिक्षणाधिकारी (माध्य.) मुंबई / ठाणे /रायगड .
३ शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई विभाग (पश्चिम/दक्षिण/उत्तर).
४ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार/डहाणू/शहापूर/पेण/पालघर.
प्रत माहितीस्तव :- मा.सचिव, राज्यमंडळ,पुणे